# घटक - भारतीय सहकारी बँक व्यवसाय

अर्थ: समान आर्थिक व्यवहार करू इच्छिणारे लोक, परस्पर साहाय्याने कार्य करतात - सहकार.

सहकारी संस्थेची प्रमुख वैशिष्ट्ये.

① नोंदवलेली संस्था:
प्रचलित सहकारी कायद्यांतर्गत नोंदणी आवश्यक.

② स्वतंत्र व कायमचे अस्तित्व.
कायद्याने स्वतंत्र अस्तित्व व कृत्रीम व्यक्तीचे स्थान व दर्जा मिळतो. त्यानुसार तिला करार करता येतो, मालमत्ता धारण करता येते, कर्ज उभारता येते, न्यायालयात जाता येते.

③ ध्येय आणि उद्देश: सभासदांच्या समान गरजा भागविणे त्यांचे आर्थिक कल्याण साधणे.

④ सभासदत्व:
सभासदत्व खुले व ऐच्छिक असते, सदस्यत्वासाठी सक्ती नसते.

⑤ मालकीहक्क व व्यवस्थापन.
सर्व सभासद - मालक. परंतु सर्वजण वारंवार एकत्र येऊ शकत नाही म्हणून व्यवस्थापक किंवा संचालक मंडळ निवडून दिलेले असते.
मतदानाचे अधिकार - एक व्यक्ती - एक मत

⑥ जबाबदारीचे स्वरूप:
अमर्यादित / मर्यादित

⑦ भांडवल उभारणी:
(i) अंतर्गत मार्गांनी - भाग भांडवल, राखीव निधी, प्रवेश फी, देणगी
भाग (शेअर्स) हस्तांतरक्षम - फक्त सभासदालाच हस्तांतरित करता येते. भागाची दर्शनी किंमत व विक्री किंमत नेहमीच समान असते.
या भागांची शेअर बाजारात विक्री केली जात नाही.
(ii) बाह्य मार्गांनी - ठेवी, कर्जे, रोख्यांची विक्री, सरकारी अनुदाने/कर्जे
ठेवी सभासद किंवा बिगर सभासदांकडून

⑧ नफ्याची विभागणी: आधुनिक सहकारी तत्त्वानुसार नफा वा आधिक्याचे न्याय्य वाटप सभासदांच्या भागभांडवलावर लाभांश रूपाने.
सहकारी संस्था १२% शक्यतो व विशेष परवानगीने १८% पर्यंत लाभांश.

## सहकाराची तत्त्वे *

इ.स. १८९५ मध्ये जिनिव्हा (स्वित्झर्लंड) येथे आंतरराष्ट्रीय सहकारी संघाची स्थापना झाली. (ICA - International Co-operative Alliance)
१९३७ - साली एक समिती.
१९६३ - मध्ये सहकार तत्त्वांचे मूल्यांकन व फेरतपासणी करण्यासाठी ICA ने भारतीय

Scanned by CamScanner

जागतिक किर्तीचे सहकार तत्वज्ञ प्रा. डी. जी. कर्वे यांच्या अध्यक्षतेखाली दुसरी समिती. त्या अहवालातील सहकाराची तत्वे;

अ) मुलभूत तत्वे:

1. ऐच्छिक सभासदत्व
2. लोकशाही संघटन
3. गुंतवलेल्या पुंजीवर व्याज
4. लाभांश वाटप
5. सभासद शिक्षण
6. संस्थांतील सहकार्य.

ब) सामान्य तत्वे:

1. रोखीने व्यवहार
2. राजकीय व धार्मिक अलिप्तता (वगळण्यात आले)
3. काटकसर
4. स्वावलंबन व परस्पर मदत.
5. सेवाभाव.

सहकारी संस्थांचे प्रकार - ① पतसंस्था ② गैरपतसंस्था

* पतसंस्था *

अ) कृषी पतसंस्था: भारतात राज्यातील कृषी पतसंस्था रचना त्रिस्तरीय.

1) ग्रामीण स्तरावरील प्राथ. कृषी सहकारी पतसंस्था.
2) जिल्हा स्तरावरील जिल्हा मध्य. सह. बँक
3) राज्य सहकारी बँक (शिखर बँक)

तसेच दीर्घ मुदतीचा कर्ज पुरवठा करणाऱ्या भूविकास बँका.

ब) गैर कृषी पतसंस्था

1) नागरी सहकारी बँका.
2) पगारदार नोकरांच्या पतसंस्था
3) प्राथ. शिक्षकांच्या पतसंस्था.

* गैरपतसंस्था *

अ) कृषी गैर पतसंस्था

1. सहकारी साखर कारखाने, खांडसरी उद्योग
2. सहकारी सूत गिरण्या
3. सहकारी दुग्ध उत्पादक संस्था.
4. सहकारी तेल प्रक्रिया संस्था
5. कृषी खरेदी विक्री संघ
6. प्राथ. मच्छिमारी पणन संस्था.

ब) गैरकृषी व गैर पतसंस्था

1. सहकारी ग्राहक भांडारे
2. सहकारी गृहनिर्माण संस्था

३) पावरलूम विणकर सह. संस्था.
४) चर्मकार सह. संस्था
५) कुंभार सह संस्था.

## * भारतातील सहकारी चळवळीचा इतिहास :*

* सहकाराचा पहिला प्रयत्न: मद्रास प्रांताच्या सहकार्याने: - मद्रास सरकारने फ्रेडरिक निकोल्सन (१८९२) यांना शेतीसाठी कशा बँका स्थापन करता येईल याच्या अभ्यासासाठी युरोपला पाठवले.
* १८९५ मध्ये जर्मनीतील रायफेजन सहकारी संस्था सारख्या संस्था भारतात स्थापन करण्याची शिफारस केली.
* १९०१ साली भारत सरकारने सर एडवर्ड लॉ यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन.
* या समितीच्या शिफारशीवरुन <u>२५ मार्च १९०४ पहिला</u> 'सहकारी पतपुरवठा संस्था कायदा' संमत केला. मात्र या कायद्याने केवळ पतपुरवठा सह संस्थाच स्थापन करण्याची संमती दिली.
* १९१२ मध्ये दुसरा सह. कायदा 'सहकारी संस्था कायदा १९१२' संमत करण्यात आला.
  - या कायद्याने बिगर पत पुरवठा संस्थांच्या स्थापनेस मंजूरी मिळाली.
  - जिल्हा मध्यवर्ती बँका स्थापनेची सुरुवात या कायद्यामुळेच झाली.
* १९१४ मध्ये सरकारने 'एडवर्ड मॅकलॅगन' समितीची स्थापना. अहवाल १९१५
  कृषी पतपुरवठ्यांच्या समस्यांचा अभ्यास करुन त्रिस्तरिय सह. संघटना निर्माण करणे - शिफारस.
* १९२५ - 'मुंबई सहकारी संस्था कायदा' - मुंबई सरकारने संमत केला.
  प्रांतासाठी स्वतंत्र सहकारी संस्था कायदा पास करणारा मुंबई हा पहिला प्रांत.
* १९२८ - लॉर्ड लिनालियगो यांच्या अध्यक्षतेखाली 'रॉयल कमिशन ऑन ॲग्रीकल्चर' ची नेमणूक
  शेतीची व ग्रामीण अर्थव्यवस्थेची पाहणी: सहकाराचे महत्व विषद केले.
* १९२९-३४ - जागतिक महामंदी: सहकार चळवळीची पिछेहाट
* १९३९-४६ - दुसऱ्या महायुद्ध कालखंड: 'सहकारी चळवळीचा पुनर्विकासाचा काल'
* १९४५ - आर जी सरैया यांच्या अध्यक्षतेखाली 'सहकारी नियोजन समिती'
* १९४९ - भारतातील नव्हे आशिया खंडातील पहिला सह. साखर कारखाना प्रवरानगर येथे
  श्री विठ्ठलराव विखे पाटील यांनी धनंजयराव गाडगीळ यांच्या प्रयत्नाने सुरु केला.
* १९५१ - गोरवाला यांच्या अध्यक्षतेखाली '<u>अखिल भारतीय ग्रामीण पतपाहणी</u> समिती'
  ५० वर्षांच्या कालखंडात (१९०४-१९५४) सहकार अपयशी ठरला असून तो यशस्वी झाला पाहिजे असे मत मांडले.
* १९६० - 'महाराष्ट्र राज्य सह. संस्था कायदा'
* १९६९ - आर बी आय ने श्री व्यंकटय्यपा यांच्या अध्यक्षतेखाली 'अखिल भारतीय ग्रामीण पत पुनर्पाहणी समिती' ची स्थापना.
* २००४ - प्रो. ए. वैद्यनाथन यांच्या अध्यक्षतेखाली - ग्रामीण सहकारी संस्थांचे पुनरुज्जीवणविषयक समिती स्थापन - त्यासाठी एक कृती योजना करण्यास सांगितले.

Scanned by CamScanner

# * भारतातील सहकारी बँक व्यवसायाची रचना *

⟹ सहकार हा विषय राज्यांचा.

## * प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था →

त्रिस्तरीय रचनेचा सगळ्यात खालचा स्तर: कार्य ग्रामीण भागात.

स्थापना ⇒ गावातील १० किंवा अधिक व्यक्ती एकत्र येऊन स्थापना करु शकतात.

⇒ सदस्यत्व शुल्क नाममात्र

⇒ अमर्यादित जबाबदारीच्या तत्वावर: (म्हणजेच ती संस्था अपयशी ठरल्यास तिची देणी देण्याची जबाबदारी - सदस्यावर)

कार्ये ⇒ i) प्रत्यक्ष ग्रामीण जनतेच्या ठेवी स्विकारणे त्यांना कर्ज देणे

ii) कर्ज अल्पकालीन व मुख्यतः कृषीसाठी.

iii) सावकाराच्या तावडीत सापडू नये म्हणून खावटी कर्जे दिली जातात. खावटी कर्ज म्हणजे 50% रक्कम 50% वस्तूच्या स्वरुपात. (70% कर्ज व 30% अनुदान)

iv) ग्रामीण जनता व जिल्हा मध्य. सह बँक यांच्यात दुवा.

भांडवल उभारणी:
1) स्वस्वामित्व निधी: सदस्यत्व फी, भागभांडवल व राखीव निधी.
2) ठेवी:- सदस्य तसेच बिगर सदस्यांकडून
3) कर्जे - जिल्हा मध्य. सह बँकेकडून.

⟹ 31 मार्च 2015 - महाराष्ट्रात २१०६४ प्राथ कृषी सह पतसंस्था -- सभासद १४४लाख.

## * जिल्हा मध्य. सह बँका *

⇒ जिल्ह्यातील सर्व प्राथमिक सहकारी संस्थांचा संघ.

प्रकार - ① शुद्ध सहकारी संघ:
- या प्रकारात जि. म. सह. बँकेचे सदस्यत्व फक्त प्राथमिक सह संस्थानाच
- हरियाणा, पंजाब, राजस्थान, ओरिसा, केरळ राज्यात

② मिश्र मध्य. सहकारी बँका:
- सदस्यत्व प्राथ. सह संस्थांना तसेच व्यक्तींना सुद्धा खुले
उदा. महाराष्ट्र तसेच इतर सर्व राष्ट्र.

कार्ये ⇒ i) प्राथ. सहकारी संस्थांना तसेच व्यक्तींना कर्जपुरवठा
ii) बहुतेक बँकांना RBI ने व्यापारी बँक व्यवसायाचा परवाना दिला आहे.

भांडवल उभारणी:
① स्वस्वामित्व निधी = सह संस्थांचे भागभांडवल व राखीव निधी
② ठेवी = सहकारी संस्थांच्या तसेच व्यक्तींच्या.
③ कर्जे = शिखर बँक, इतर बँका.

महाराष्ट्रात जिल्हे 36 जिल्हापरिषद = 34 जिल्हा म. सह बँका = 31
जिल्हा भू विकास बँका = २९

## * राज्य सहकारी बँक *

⇒ त्रिस्तरीय रचनेच्या शिरोभागी - म्हणून शिखर बँक म्हणतात.
⇒ जिल्हा मध्य बँक व RBI व NABARD यांच्यात दुव्याचे कार्य.

सदस्यत्व ⇒ i) जिल्हा म. सह बँकांचे प्रतिनिधी.
ii) वैयक्तिक भागधारक

नियंत्रण ⇒ NABARD चे नियंत्रण

कार्ये ⇒ i) जिल्हा मध्य. सह बँकांना व त्यांच्या माध्यमातून प्राथ. सह संस्थांना वित्तपुरवठा करणे त्यांच्या कार्याचे नियंत्रण व पर्यवेक्षण
ii) शहरी भागातून ठेवी गोळा करून ग्रामीण भागात पसरविण्याचे कार्य.
iii) सामान्यतः व्यापारी बँकविषयक कार्ये करण्यास मनाई (मात्र सध्या ३१ राज्य सह बँकांपैकी १५ बँकांना परवाना)

भांडवल उभारणी :
i) स्वस्वामित्व निधी = भाग भांडवल व राखीव निधीचा समावेश
त्रि. म. स संस्था, सदस्य सह संस्था, वैयक्तिक सदस्य व राज्यसरकारमार्फत.
ii) ठेवी ⇒ सहकारी संस्था तसेच व्यक्तींच्या, त्रि. म. स. बँका.
iii) कर्जे ⇒ नाबार्ड, SBI, व्यापारी बँका, राज्य सरकारकडून.

⇒ भारतात मार्च २०१५ अखेर ३२ रा. सह बँका.
महाराष्ट्रात राज्य सह बँक शिखर बँक ⇒ स्थापना - ११०५-१९११
चार प्रादेशिक कार्यालये ⇒ औरंगाबाद, नाशिक, पुणे व नागपूर..

~~कार्ये~~:

## * नागरी सहकारी बँका *.

⇒ जर्मनी व इटली देशातील नागरी चळवळीपासून प्रभावित होवून.
⇒ ५ फेब्रु १८८९ - प्रा. विठ्ठल लक्ष्मण कवठेकर. बडोदा शहरात 'परस्पर साहाय्यकारी मंडळी' स्थापना.
⇒ १९०४ च्या कायद्याने कायदेशीर दर्जा मिळाला = नागरी सह. बँक स्थापन करण्यास.
⇒ १९४९ - चा बँकिंग नियमन कायदा - १ मार्च १९६६ - नागरी सह. बँकांना लागू.
⇒ त्रिस्तरीय रचनेतील सर्वात खालच्या स्तरावर मात्र ⟶ शहरी भागात काम.

व्याख्या : नागरी सह बँक म्हणजे अशी बँक - जी प्राथमिक कृषी बँकेपासून वेगळी असून
i) तिचा प्राथमिक उद्देश - बँकिंग व्यवसाय करणे
ii) भाग भांडवल व राखीव निधी : एक लाखापेक्षा जास्त
iii) इतर सहकारी संस्थांना सभासदत्व देण्याची तरतुद नाही.

कार्ये : i) ठेवी स्विकारणे, कर्जे देणे
ii) सुरक्षा कक्ष, क्रेडिट कार्ड व डेबिट कार्ड.
iii) पैशांची पाठवणी iv) हुंड्या वटविणे.

Scanned by CamScanner

* हुंडी म्हणजे काय?

व्यक्ती ⟷ व्यक्ती
व्यक्ती ⟷ व्यापारी
व्यापारी ⟷ व्यापारी
} यांच्यातील व्यापार सुलभ करण्याचे आर्थिक साधन.

**नियंत्रण** ⇒ RBI व राज्य सरकारचे सहकार खाते. - म्हणून दुहेरी नियंत्रण म्हणतात.

**प्रगती** ⇒ सध्या भारतात १५०० पेक्षा अधिक UCBS
पैकी ५२ अनुसुचित।
सर्वाधिक UCBs महाराष्ट्रात.

## * भू - विकास बँका *

**व्याख्या** : शेतकऱ्यांना शेतीविकासासाठी जमीन तारणावर दीर्घ मुदतीचा कर्ज पुरवठा करणारी सहकारी तत्त्वावर स्थापन झालेली, मर्यादित जबाबदारीच्या तत्त्वावर काम करणारी संस्था.

**इतिहास** : सुरुवातीला - भू-तारण बँका म्हणले जाई.
भारतात = १९२० साली पंजाबमध्ये झांग येथे अशी पहिली बँक
खरा प्रारंभ = १९२९ - मद्रास: 'मध्यवर्ती भू-तारण बँक.' स्थापन.
सध्या 'राज्य सह. कृषी व ग्रामीण विकास बँक' असे नामकरण.

**संघटन** - जगभरात तीन प्रकारचे संघटन : ① संयुक्त भांडवली तत्त्वावर
② सहकारी तत्त्वावर
③ निम-सहकारी तत्त्वावर - (सहकार + भांडवली)

⇒ भारतातील बँका निम-सहकारी तत्त्वावर
नोंदणी - सहकारी संस्था कायद्यांतर्गत - मर्यादित जबाबदारी तत्त्व
सदस्यांना कर्ज मिळण्याची क्षमता त्यांनी धारण केलेल्या भागांच्या संख्येशी निगडीत
⇒ मतदान अधिकार - एक व्यक्ती - एक मत.

**संरचना** - राज्यापरत्वे वेगळी : - दोन प्रकार :

① **संघानुवर्ती प्रकार** -

⇒ **द्विस्तरीय** : राज्य स्तर - मध्य भू विकास बँक - राज्य सह. कृषी व ग्रामीण विकास बँक (शिखर)
स्थानिक स्तर - प्राथ — " — - प्राथ — " —
अशी संरचना : आं.प्र, आसाम, पंजाब, केरळ, हरियाणा. मध्य प्र, कर्नाटक, महाराष्ट्र (२००१ 2009 पासून)

② **एकात्मिक / एकानुवर्ती** -

फक्त मध्य भू- विकास बँक - आपल्या शाखामार्फत काम.
बिहार, गुजरात, जम्मू-का, उ.प्र.
महाराष्ट्रात (१९७३ ते २०००) दरम्यान

Scanned by CamScanner

**प्रगती** : १९५१ साली देशात ५ राज्य भूविकास बँका – २८० प्राथ. भूविकास बँका.
मार्च २०१५ अखेर- २० राज्य भूविकास बँका – ७९४ –॥–

## महाराष्ट्रातील भूविकास बँकांची रचना व सद्यास्थिती

- मे १९७३ पूर्वी जिल्हा स्तरावर स्वतंत्र अस्तित्व असलेल्या ..' जिल्हा सह. भूविकास बँका'
- १ मे १९७३ - सर्व जिल्हा सह.भू. बँकांचे एकत्रिकरण करुन ' महाराष्ट्र राज्य सह भूविकास बँक'
  (वसंतराव नाईक व सहकारमंत्री यशवंतराव मोहिते यांच्या काळात)
- त्रिस्तरीय रचना तयार झाली : १) राज्य : महाराष्ट्र राज्य सह भूविकास बँक.
  २) जिल्हा : राज्य बँकेच्या शाखा
  ३) तालुका - राज्य बँकेच्या उपशाखा.
- १९८८ मध्ये राज्य बँकेचे नाव : 'महाराष्ट्र राज्य सह कृषी व ग्रामीण विकास बँक' असे झाले.
- १९९१ - संचित तोटा वाढल्याने पुन्हा जिल्हास्तरीय स्वतंत्र जिल्हा भू-विकास बँकांची स्थापना.
- १ ऑक्टो २००१ - पुनर्रचना : त्यानुसार २९ - जिल्हा सह. कृषी, ग्रामीण, बहुउद्देशीय विकास बँका स्थापन.
  महाराष्ट्र राज्य सह.कृ.ग्रा.व. विकास बँक – शिखर बँक.

## भांडवल उभारणी

① स्वस्वामित्व निधी
② ठेवी
③ कर्जे - नाबार्ड, स्टेट बँक, व्यापारी बँका, राज्य सरकार
④ कर्जरोखे विक्री : सर्वात जास्त या स्त्रोतातून.
  ① सामान्य कर्जरोखे - २० ते २५ वर्ष मुदत
  ② ग्रामीण –॥– ७ –॥–

## भूविकास बँकांची कार्ये

अ) प्राथ. भूविकास बँक कार्ये : शेतकऱ्याना अल्पदरात दीर्घ मुदतीची कर्जे
१) जुन्या कर्जाची परतफेड
२) शेतजमीन, कृषी यंत्रसामग्री खरेदी
३) जमीन सपाटीकरण, सिंचन सुविधा ई.
४) गोदाम बांधण्यासाठी
५) शेती संलग्न उद्योग
६) शेतीवर आधारित प्रक्रिया उद्योग.

ब) राज्य मध्य भू.बँक कार्ये. १) प्राथ.भू. बँकांना दीर्घ मुदतीची कर्जे.
२) कर्ज रोख्यांची विक्री, ठेवी स्विकारणे.
३) प्राथ.भू. बँक. नियंत्रण, मार्गदर्शन, तपासणी.
४) प्राथ भू. बँक व नाबार्ड — मध्यस्थ

महाराष्ट्रातील सर्व भू विकास बँका अवसायनात :
→ अनेक वर्षापासून तोट्यात : वसुलीचे प्रमाण कमी
→ बँका गुंडाळण्याचे सरकार आयुक्तांचे आदेश.

Scanned by CamScanner

⇒ नाबार्डकडून लोणारा वित्तपुरवठा बंद
⇒ त्यामुळे कर्जपुरवठा बंद

# घटक - रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया

⇒ RBI - देशाची मध्यवर्ती बँक. सर्वोच्च वित्तीय संस्था.
RBI मार्फे मौद्रिक व द्रव्यविषयक धोरण राबवले जाते
⇒ १६५६ मध्ये स्थापन झालेली रिक्स बँक ऑफ स्वीडन जगातील पहिली मध्यवर्ती बँक.
१६९४ - बँक ऑफ इंग्लंड.

वैशिष्ट्ये - मध्यवर्ती बँकेची.
1) सर्वोच्च वित्तीय संस्था
2) सरकारच्या मालकीची - राजकीय हस्तक्षेपापासून दूर.
3) हेतू नफा कमावणे नसून अर्थव्यवस्थेला स्थैर्य देणे.
4) बँक व्यवस्थेचा विकास.

## RBI ची स्थापना व राष्ट्रीयीकरण.

- शिफारस : ग. ज. वॉरन हेस्टिंग्ज - 'जनरल बँक ऑफ बंगाल अँड बिहार' स्थापण्याचा सल्ला.
- १९२६ : हिल्टन यंग. अध्यक्ष. 'दि रॉयल कमिशन ऑन इंडियन करन्सी अँड फायनान्स' मध्यवर्ती बँक स्थापण्याची शिफारस.
- १९३३ - गोलमेज परिषदांच्या शिफारशीवरून कायदेमंडळात विधेयक
- 6 मार्च १९३४ - ग. ज. ची संमती. - RBI Act 1934.
- १ एप्रिल १९३५ - RBI ची स्थापना. - खाजगी क्षेत्रात.
- अधिकृत भागभांडवल - ५ कोटी. प्रत्येक भाग - १००रु. - १६ सदस्यांचे मंडळ.
- १९४७ पर्यंत ब्रह्मदेशाची व १९४७ ते ३० जून १९४८ पर्यंत पाकिस्तानची मध्यवर्ती बँक म्हणून.
- १९४८ - RBI कायदा 1948 - सार्वजनिक मालकीकडे हस्तांतरण. १ जाने ४९ पासून राष्ट्रीयीकरण
- सरकारने भागधारकांना प्रत्येक भागासाठी ११८ रु १० आणे दिले व सर्व भाग विकत घेतले.

## RBI चे संघटन व व्यवस्थापन

- स्थापनेच्या वेळी RBI मुख्यालय कलकत्ता : पुढे १९३७ मध्ये मुंबई
- मध्यवर्ती संचालक मंडळ : सध्या मंडळात २० सदस्य - त्यापैकी एक गव्हर्नर चार डेप्युटी गव्हर्नर्स

नेमणूक केंद्रसरकारमार्फत जास्तीत जास्त ५ वर्षांसाठी - पुनर्नेमणुकीसाठी पात्र
गव्हर्नर ⟶ RBI चा मुख्य कार्य अधिकारी असतो.
इतर सदस्य नेमणूक ⟶ केंद्रसरकार मार्फत ⟶ ४ वर्षासाठी
मध्यवर्ती मंडळाच्या दरवर्षी कमीत कमी 6 सभा होणे आवश्यक.
एन एस विश्वनाथन, BP कानुंगो, विरल आचार्य, महेश कुमार जैन Deputy Governors

Scanned by CamScanner